श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान
तुळजापूर जि. धाराशिव (महाराष्ट्र)-४१३ ६०१
दूरध्वनी : ०२४७१ - २४२०३१

Shri Tuljabhavani Temple Trust
Tuljapur, Dist. Dharashiv (Mah.) - 413 601
Tel. : 02471 - 242031

Web Site: https://www.shrituljabhavani.org E-mail : shreetuljabhavanitemple@gmail.com

ISO : 9001 : 2008

जा.क्र.:- श्रीतुभमंसंतु/2026-27/भांडार/सी.आर.01/ 1278

दिनांक :- 08 07 /2026

## श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर
## जाहीर प्रगटण

सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर येथे श्रीदेविजींस अर्पण आलेल्या पितळी घाट-घंट्या, पितळी समई, निरंजन, मूर्ती प्रतिमा, स्टील, तांबे व पितळी भांडी (ताट, वाटी, फुलपात्र, पंचपाळ, ग्लास, तांब्या, डबा इत्यादी), जर्मन, प्लास्टीक, लोखंडी वस्तू, लाकूड व कपडा इत्यादी साहित्य ''**जसे आहे व जेथे आहे**'' या तत्त्वावर जाहीर लिलाव दिनांक 19 / 08 /2026 रोजी सकाळी ठीक 11:00 वाजता श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर नवीन प्रशासन कार्यालय येथे होणार आहे. लिलावाच्या अटी व शर्ती मंदिर संस्थानचे **https://shrituljabhavani.org** या अधिकृत संकेतस्थळावर व मंदिर प्रशासन कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील. तसेच सदरील पितळी घाट-घंट्या, पितळी समई, निरंजन, मूर्ती प्रतिमा, स्टील, तांबे व पितळी भांडी (ताट, वाटी, फुलपात्र, पंचपाळ, ग्लास, तांब्या, डबा इत्यादी), जर्मन, प्लास्टीक, लोखंडी वस्तू, लाकूड व कपडा इत्यादी साहित्य मंदिर प्रशासन कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. लिलाव बोली ही मंदिर संस्थानने निश्चित केलेल्या लघूत्तम किंमतीपेक्षा अधिक बोली बोलावी लागेल. प्रति किलोस अधिकत्तम बोली आल्यानंतरच उक्त नमूद वर्णननिहाय साहित्याचे कोणत्याही शासकीय वजनकाट्यावर वजन करुनच व लिलाव बाबींस योग्य किंमत आल्यावरच लिलाव बाब अंतिम केली जाईल. लिलाव बाबींपैकी कोणतीही बाब रद्द करण्याचा अथवा सदर लिलावाचे अटी शर्तीमध्ये फेरबदल करण्याचा अधिकार मंदिर प्रशासनाने राखून ठेवलेला आहे.

**(माया माने)**
**तहसिलदार तथा**
**व्यवस्थापक (प्रशासन)**
श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर

**(कीर्ती किरण पुजार, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, धाराशिव**
**तथा अध्यक्ष,**
श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान
तुळजापूर, जि. धाराशिव (महाराष्ट्र) - ४१३ ६०१
दूरध्वनी : ०२४७१ - २४२०३१
Shri Tuljabhavani Temple Trust
Tuljapur, Dist. Dharashiv (Mah.) - 413 601
Tel. : 02471 - 242031
Web Site: https://www.shrituljabhavani.org E-mail : shreetuljabhavanitemple@gmail.com
ISO : 9001 : 2008

जा.क्र.:- श्रीतुभमंसंतु/2026-27/भांडार/सी.आर.01/ 1279

दिनांक :- 08 /07 /2026

## पितळी घाट- घंट्या, पितळी समई, निरंजन, मूर्ती प्रतिमा, स्टील, तांबे व पितळी भांडी (ताट, वाटी, फुलपात्र, पंचपाळ, ग्लास, तांब्या, डबा इत्यादी), जर्मन, प्लास्टीक, लोखंडी वस्तू, लाकूड व कपडा इत्यादींचा जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती

1) लिलाव प्रक्रिया सुरु होणेपूर्वी बोली धारकांस रुपये 5,000/- (अक्षरी रुपये पाच हजार फक्त) अनामत रक्कम म्हणून मंदिर संस्थान कार्यालयात भरावी लागेल.
2) लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्तीला लिलावाच्या ठिकाणी दिनांक 19 / 08 /2026 रोजी सकाळी टीक 11:00 वाजता स्वत: व्यक्तीश: हजर रहावे लागेल.
3) बोली धारकांनी पितळी घाट-घंट्या, पितळी समई, निरंजन, मूर्ती प्रतिमा, स्टील, तांबे व पितळी भांडी (ताट, वाटी, फुलपात्र, पंचपाळ, ग्लास, तांब्या, डबा इत्यादी), जर्मन, प्लास्टीक, लोखंडी वस्तू, लाकूड व कपडा इत्यादींचा लिलाव ठिकाणाहून दोन दिवसांचे आत स्वखर्चाने मजुरासह घेवून जाण्याची सर्वस्वी जबाबदारी ही अंतिम बोली धारकाची राहील.
4) लिलावाबाबत मंदिर प्रशासन कार्यालय लिलाव प्रक्रिया अंतिम झाल्यानंतर कोणत्याही स्वरुपाच्या तक्रारीची दखल घेणार नाही.
5) प्रति किलोस लिलाव बोली मंदिर संस्थानाने निश्चित केलेल्या लघुत्तम किंमतीपेक्षा अधिक बोली बोलावी लागेल.
6) पितळी घाट-घंट्या, पितळी समई, निरंजन, मूर्ती प्रतिमा, स्टील, तांबे व पितळी भांडी (ताट, वाटी, फुलपात्र, पंचपाळ, ग्लास, तांब्या, डबा इत्यादी), जर्मन, प्लास्टीक, लोखंडी वस्तू, लाकूड व कपडा इत्यादींचा साहित्य लिलावधारकाने वाहनातून कोणत्याही शासकीय वजन काट्यावर वजन करुन त्यानंतरच झालेले वजन X अंतिम दर याप्रमाणे होणारी सर्व लिलाव रक्कम मंदिर प्रशासनास त्याच दिवशी जमा करावी लागेल. त्याकरिता मंदिर संस्थानचे प्रतिनिधी सोबत असतील.
7) लिलाव बोलीस भरलेली अनामत रक्कम कार्यालयीन प्रक्रिया पूर्ण झालेनंतर ऑनलाईन पध्दतीने संबंधित बोलीधारकांस प्रदान करण्यात येईल.
8) अंतिम मंजूर बोलीची संपूर्ण रक्कम मंदिर प्रशासन कार्यालयात भरल्याशिवाय लिलाव साहित्याचा ताबा दिला जाणार नाही, याची यशस्वी बोलीधारकाने नोंद घ्यावी.
9) लिलाव साहित्य, लिलावाची प्रक्रिया पूर्ण झाल्यापासून लवकरात लवकर स्वत: स्वखर्चाने उचलणे व वाहतूक करणे हे अंतिम लिलाव घेणाऱ्याची सर्वस्वी जबाबदारी राहील.
10) लिलावधारकांनी हे स्पष्टपणे जाहीर करण्यात येते की, या लिलाव अटी व शर्तीत कोणत्याही क्षणी फेरबदल करण्याचा अगर त्या रद्दबातल ठरविण्याचा अधिकार मंदिर प्रशासनास राहील. कोणत्याही बाबीबद्दल तक्रार आल्यास श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर प्रशासन यांचा निर्णय अंतिम राहील.
11) सदर लिलावात एकत्रित लघुत्तम किंमत ही जी.एस.टी सह असून त्यास येणाऱ्या अंतिम मंजूर बोली ही जी.एस.टी सहच असणार आहे.

(माया माने)
**तहसिलदार तथा**
**व्यवस्थापक (प्रशासन)**
श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर

(कीर्ती किरण पुजार, भा.प्र.से.)
**जिल्हाधिकारी, धाराशिव**
**तथा अध्यक्ष,**
श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर